मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक ९ मार्च २०२४ । पान १

# तुम्ही सत्तेसाठी पक्ष सोडला, आम्ही तत्वांसाठी

## खासदार श्रीरंग बारणेंवर संजोग वाघेरे यांचा पलटवार..!

**। पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** खासदार श्रीरंग बारणे हे विद्यमान खासदार आहेत. ते जर मतदारसंघातील नागरिकांना ओळखत नसतील तर ही शोकांतिका आहे. त्यांना समजलं पाहिजे की ते कुणाबद्दल बोलत आहेत. कारण मी त्यांच्या मतदारसंघात राहतो. माझं मूळ गाव, जन्मभूमी आणि कर्मभूमी ही पिंपरी गाव आहे. ते चुकीचं बोलत आहेत, असं म्हणत संजोग वाघेरे यांनी बारणे यांना खोचक टोला लगावला. पुढे ते म्हणाले, ते कुठल्या पक्षातून कुठल्या पक्षात आले आहेत, हे सर्वांना माहीत आहे. त्यांनी सत्तेसाठी पक्ष सोडला. आम्ही तत्वांसाठी पक्ष सोडला. आम्ही सत्तेसाठी





दुसऱ्या पक्षात गेलो नाहीत, असे खणखणीत प्रत्यूत्तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी दिली आहे. मावळचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी नुकतीच संजोग वाघेरे यांच्यावर टीका करत त्यांच्यावर अधिक बोलण्यास नकार दिला होता. 'ज्या व्यक्तीचा मावळ मतदारसंघात थांगपत्ता नाही अशा व्यक्तींवर मी बोलणार नाही. पक्षनिष्ठेबाबत त्यांनी मला सांगू नये',असे बारणे यांनी म्हटले होते.मावळ लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार श्रीरंग बारणे आणि शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात जुंपली आहे. दोन्ही उमेदवारांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. नुकतेच श्रीरंग बारणे यांनी संजोग वाघेरे यांच्यावर मी बोलणार नाही. त्यांचा मतदारसंघात थांगपत्ता नाही. त्यांच्यावर काय बोलू असं म्हणत टीका केली होती. यावर संजोग वाघेरे यांनी पलटवार करत सत्तेसाठी पक्ष बदलणाऱ्यांनी बोलू नये, असा टोला लगावला आहे. संजोग वाघेरे पिंपरीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.महाविकास आघाडीचे जागा वाटपाचे सूत्र निश्चित झाले नसताना उद्धव ठाकरे यांनी रायगड दौऱ्यात मावळमधून संजोग वाघेरे यांची उमेदवारी जाहीर करताच वाघेरे यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. विजय निश्चित असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता पुढील आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. राजकीय पक्षांकडून निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे. ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मावळ मतदारसंघातील रायगड जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात दौरा केला. या दौऱ्यात वाघेरे यांची उमेदवारी जाहीर केली.

### जन्मभूमी आणि कर्मभूमी पिंपरी

» ते विक्रमी मतांनी विजयी होतील, असा विश्वासही ठाकरे यांनी व्यक्त केला. ठाकरे यांनी उमेदवारी जाहीर करताच वाघेरे यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये नागरिकांच्या गाठीभेटी घेण्यावर भर दिला आहे.खासदार श्रीरंग बारणे हे विद्यमान खासदार आहेत. ते जर मतदारसंघातील नागरिकांना ओळखत नसतील तर ही शोकांतिका आहे. त्यांना समजलं पाहिजे की ते कुणाबद्दल बोलत आहेत. कारण मी त्यांच्या मतदारसंघात राहतो. माझं मूळ गाव, जन्मभूमी आणि कर्मभूमी ही पिंपरी गाव आहे. ते चुकीचं बोलत आहेत, असं म्हणत संजोग वाघेरे यांनी बारणे यांना खोचक टोला लगावला. पुढे ते म्हणाले, ते कुठल्या पक्षातून कुठल्या पक्षात आले

# सौरऊर्जा वापर म्हणजे बचतीचा समृद्धी महामार्ग : काटे

## नगरसेवक शत्रुघ्न (बापु) काटे यांच्या हस्ते सौर पॅनल यंत्रनेचे उद्घाटन

**। पिंपरी-चिंचवड।** पिंपळे सौदागर येथील कुंदन इस्टेट या सोसायटीमध्ये आज (दि.०८) नवीन सौर पॅनल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. या नवीन सौर पॅनल यंत्रनेचे उद्घाटन नगरसेवक शत्रुघ्न (बापु) काटे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी शत्रुघ्न काटे यांनी हा सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल सोसायटीचे चेअरमन ऋषी पाटील व त्यांचे सहकारी मित्रांचे अभिनंदन



केले.यावेळी नगरसेवक शत्रुघ्न काटे म्हणाले की, भविष्यात ऊर्जेचे पर्याय शोधणे महत्वाचे ठरणार आहे. त्यासाठी सौर ऊर्जा हा अतिशय चांगला पर्याय आहे. घराच्या छतावर जर सोलर पॅनेल बसवले तर वीजबिलाच्या खर्चापासून सुट्टी मिळू शकते. विशेष म्हणजे तुम्ही स्वतःच्या खर्चाने आणि सरकारच्या सबसिडीच्या मदतीने सोलर पॅनेल घराच्या छतावर लावू शकता. सरकार देखील तुम्हाला या अभियानात पुढाकार घेत मदत करत आहे. अलीकडच्या काळात कमी खर्च आणि शुद्ध उर्जे चा पर्याय म्हणून सोलार पॅनल सारख्या घटकांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. तसेच या उदघाटन प्रसंगी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी परिसरातील सर्व गृहनिर्माण संस्थानी अश्या सोलर पॅनल उभारणी बाबत पुढाकार घ्यावा असे आवाहन केले आहे.

# इंधनाचा काळाबाजार करणारी टोळी अटकेत

## विमानाच्या इंधानाचा काळाबाजार करुन वाढीव दराने विक्री

**| पिंपरी-चिंचवड |**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

विमानाच्या इंधानाचा काळाबाजार करुन वाढीव दराने विक्री करणाऱ्या पाच जणांच्या टोळीला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. सोमाटणे टोल नाक्याजवळ काळा बाजार सुरु असताना पोलिसांनी बुधवारी कारवाई करत इंधनाचे दोन टँकर ताब्यात घेतले आहेत. मंगेश सखाराम दाभाडे (वय ४२, रा. तळेगाव दाभाडे), इलाही सैफन फरास (वय ४५, रा. धानोरी, पुणे), अनिल सतईराम जस्वाल (वय २८, रा. उत्तरप्रदेश), अमोल बाळासाहेब गराडे (वय ३१, रा. पिंपळखुटे, ता. मावळ) आणि परशुराम उर्फ सोन्या धोंडीबा गायकवाड (वय ३६, रा. चऱ्होली खुर्द, ता. खेड)




अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. सोमाटणे टोल नाक्याजवळ विमानाला लागणारे इंधन टँकरमधून काढून त्याची विक्री करण्याचा काळा बाजार सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा मारून कारवाई केली. जागा मालक मंगेश दाभाडे याने टँकर चालक ईलाही आणि अनिल या दोघांशी संगनमत करून अमोल आणि परशुराम याच्या मदतीने टँकरमधून जेट इंधन काढून घेत असताना त्यांना पोलिसांनी पकडले.इंधन भरलेले टँकर नवी मुंबई येथील जेएनपीटी बंदरातून पुणे विमानतळावर येत असतात. टँकरमध्ये इंधन भरताना इंधनाच्या पृष्ठभागावर तवंग येतो. त्याच वेळी टँकरमधील इंधनाची मोजणी केली जाते. टँकर जेव्हा पुणे विमानतळावर येतो तेव्हा तवंग कमी झालेला असतो. त्यामुळे त्याची पातळी कमी दाखवली जाते. या तांत्रिक अडचणीचा फायदा आरोपींनी घेतला. हजारो लिटर इंधन भरलेल्या टँकरमधून ७० ते ८० लिटर इंधन काढून घेतल्यास कोणालाही संशय येत नव्हता. आरोपी चोरीचे इंधन काळ्या बाजारात चढ्या दराने विकत होते. आरोपींकडून एक हजार ५४० लिटर एटीएफ/जेट इंधन, रिकामे प्लास्टिक कॅन, लोखंडी टॉमी, इंधन मोजण्यासाठी लागणारी लोखंडी पट्टी असा एकूण एक लाख ६५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, मुख्य आरोपी मंगेश दाभाडे याच्यावर पाच गुन्हे दाखल आहेत.मंगेश सखाराम दाभाडे (वय ४२, रा. तळेगाव दाभाडे), इलाही सैफन फरास (वय ४५, रा. धानोरी, पुणे), अनिल सतईराम जस्वाल (वय २८, रा. उत्तरप्रदेश), अमोल बाळासाहेब गराडे (वय ३१, रा. पिंपळखुटे, ता. मावळ) आणि परशुराम उर्फ सोन्या धोंडीबा गायकवाड (वय ३६, रा. चऱ्होली खुर्द, ता. खेड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. सोमाटणे टोल नाक्याजवळ विमानाला लागणारे इंधन (एटीएफ/जेट इंधन) टँकरमधून काढून त्याची विक्री करण्याचा काळा बाजार सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा मारून कारवाई केली. जागा मालक मंगेश दाभाडे याने टँकर चालक ईलाही आणि अनिल या दोघांशी संगनमत करून अमोल आणि परशुराम याच्या मदतीने टँकरमधून जेट इंधन काढून घेत असताना त्यांना पोलिसांनी पकडले.इंधन भरलेले टँकर नवी मुंबई येथील जेएनपीटी बंदरातून पुणे विमानतळावर येत असतात. इंधन भरताना इंधनाच्या पृष्ठभागावर तवंग येतो. त्याच वेळी टँकरमधील इंधनाची मोजणी केली जाते.

# महापालिकेच्या धनामध्ये साडेपाच कोटींची बचत

## नगरसेवकांचे मानधन, भत्ते, चहापाणी यावर खर्चाची बचत

**| पिंपरी-चिंचवड |**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पालिकेतील प्रशासकीय राजवटीला १३ मार्च २०२४ रोजी दोन वर्षे पूर्ण होत आहेत. यामुळे १३३ नगरसेवकांचे मानधन, भत्ते, वाहनांचे इंधन, चहापाणी यावर होणाऱ्या साडेपाच कोटी रुपयांच्या खर्चाची बचत झाली आहे. मान नसल्याने महापालिकेचे धन वाचल्याने निवडणूक लांबल्याचा असाही फायदा झाला आहे. तसेच पदाधिकाऱ्यांच्या दालनातील कर्मचारीवर्ग इतर विभागांसाठी उपलब्ध झाले आहेत. प्रभागरचनेचा घोळ, ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण, राज्यातील सत्ता बदलामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर गेल्या आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये १३ मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट आहे. महापालिकेत जनतेतून निवडून येणारे १२८, तर स्वीकृत पाच असे १३३ नगरसेवक आहेत. या नगरसेवकांना दरमहा १५ हजार रुपये मानधन दिले जाते. दोन वर्षांपासून नगरसेवक नसल्याने मानधनाच्या चार कोटी ८० लाख रुपयांची बचत झाली आहे. महापौर, उपमहापौर, स्थायी




समिती अध्यक्ष, सत्तारूढ पक्षनेते, विरोधी पक्षनेते, शिक्षण, क्रीडा, विधी, शहर सुधारणा, महिला आणि बालकल्याण, जैवविविधता, वृक्ष प्राधिकरण समिती सभापती, शिवसेना, मनसे गटनेते, नगरसेवकांच्या चहापानावर दर महिन्यास सुमारे एक लाखापेक्षा अधिक खर्च होत होता. त्यावरील किमान २४ लाखांच्या खर्चाची दोन वर्षांत बचत झाली आहे.महापौरांसह विषय समितीच्या सभापतींना स्वतःची मोटार वापरल्यास इंधन भत्ता दिला जातो. महापौरांना पाच लाख, उपमहापौरांना साडेतीन लाख, स्थायी समिती सभापतीना चार लाख, सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेत्याला प्रत्येकी साडेतीन लाख, तर इतर समित्यांच्या सभापतीना प्रत्येकी तीन लाख रुपये वार्षिक इंधन भत्ता दिला जातो. त्याचे दोन वर्षांचे ५५ लाख ८० हजार रुपये वाचले आहेत. महापालिकेतील प्रत्येक महासभेला शंभर रुपये भत्ता दिला जातो. १३३ नगरसेवकांना प्रति महिना प्रत्येक महासभेला शंभर रुपये याप्रमाणे १३ हजार ३०० रुपये भत्ता दिला जातो. त्याचे दोन वर्षांचे तीन लाख १९ हजार २०० रुपये वाचले आहेत. अशा एकूण पाच कोटी ६२ लाख रुपयांची बचत झाली आहे.महापालिकेत महापौरांसह सर्व पदाधिकाऱ्यांना स्वतंत्र दालने होती. स्वीय सहायक, टंकलेखक आणि कर्मचारी नेमण्यात आले होते. नगरसेवक नसल्याने ही दालने बंद करण्यात आली आहेत. तेथील कर्मचाऱ्यांना इतर विभागांत वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे मनुष्यबळाची बचत झाली आहे.

# मतदान यंत्रे ठेवलेल्या गोदामात आग

## सतर्क यंत्रणेत बिघाड, आयोगाच्या परवानगीने दुरुस्ती

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

सासवड येथील प्रारूप मतदान यंत्रे चोरीला गेल्याच्या प्रकारानंतर मतदान यंत्रे ठेवण्यात आलेल्या कोरेगाव पार्क येथील भारतीय खाद्य गोदामाच्या (फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया – एफसीआय) आग सतर्क यंत्रणेत (फायर अलार्म) तांत्रिक बिघाड झाला. भारत निवडणूक आयोगाच्या परवानगीने आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत हा बिघाड दुरुस्त करण्यात आला. गोदामातील सर्व मतदान यंत्रे सुस्थितीत असल्याचे जिल्हा निवडणूक शाखेकडून सांगण्यात आले.भारतीय खाद्य गोदामात लोकसभा निवडणुकीसाठी वापरण्यासाठी प्रथमस्तरीय तपासणी झालेली मतदान यंत्रे ठेवण्यात आली आहेत. गुरुवारी रात्री सातच्या सुमारास या गोदामातील आग सतर्क यंत्रणेत बिघाड होऊन भोंगा अचानक वाजण्यास सुरुवात झाली. सुरक्षारक्षकांनी तत्काळ प्रशासनाला माहिती दिली. अग्निशामक सिलिंडर या ठिकाणी होते, तरीदेखील खबरदारीचा उपाय म्हणून अग्निशामक बंब मागविण्यात आला. गोदामाचे सीसीटीव्ही चित्रीकरणही तपासण्यात आले. तपासणीनंतर तंत्रज्ञांनी आग सतर्क यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले. या प्रकाराची माहिती तत्काळ निवडणूक आयोगाला पाठविण्यात आली आणि बिघाड दुरुस्त करण्याची परवानगी घेण्यात आली.निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समक्ष गोदाम उघडण्यात आले. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते. गोदामातील सर्व मतदान यंत्रे सुस्थितीत असल्याची खात्री करून बिघाड दुरुस्त करण्यात आला. पक्ष प्रतिनिधींनादेखील याबाबत माहिती देण्यात आली. प्रक्रियेचे चित्रीकरणदेखील करण्यात आले. याबाबतचा अहवाल निवडणूक आयोगाला पाठविण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशामक अधिकाऱ्यांकडून तांत्रिक बाबी संदर्भात अहवाल मागविण्यात आला आहे. तो प्राप्त होताच या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये या दृष्टीने आवश्यक खबरदारीच्या अतिरिक्त उपाययोजना करण्यात येतील, असे जिल्हा निवडणूक शाखेने स्पष्ट केले.. तपासणीनंतर तंत्रज्ञांनी आग सतर्क यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले. माहिती आयोगाला पाठविण्यात आली आणि बिघाड दुरुस्त करण्याची परवानगी घेण्यात आली.निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समक्ष गोदाम उघडण्यात आले.



### तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार

» भारतीय खाद्य गोदामात लोकसभा निवडणुकीसाठी वापरण्यासाठी प्रथमस्तरीय तपासणी झालेली मतदान यंत्रे ठेवण्यात आली आहेत. गुरुवारी रात्री सातच्या सुमारास या गोदामातील आग सतर्क यंत्रणेत बिघाड होऊन भोंगा अचानक वाजण्यास सुरुवात झाली. सुरक्षारक्षकांनी तत्काळ प्रशासनाला माहिती दिली. अग्निशामक सिलिंडर या ठिकाणी होते, तरीदेखील खबरदारीचा उपाय म्हणून अग्निशामक बंब मागविण्यात आला. गोदामाचे सीसीटीव्ही चित्रीकरणही तपासण्यात आले. तपासणीनंतर तंत्रज्ञांनी आग सतर्क यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समक्ष गोदाम उघडण्यात आले. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.

# कॅब कंपन्यांवर परिवहन विभागाचा कारवाईचा दंडुका!

## प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

उपयोजन व संकेतस्थळाद्वारे प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याचे समोर आले आहे. अशा १८ कंपन्यांवर कारवाई करून त्यांचे उपयोजन व संकेतस्थळे बंद करण्याची भूमिका परिवहन विभागाने घेतली आहे. याबाबत परिवहन विभागाकडून पोलिसांच्या सायबर सेलच्या विशेष महानिरीक्षकांना कळविण्यात येणार आहे. याप्रकरणी पुण्याचे प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांना पत्र पाठविले आहे. त्यात त्यांनी उपयोजन व संकेतस्थळाद्वारे प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांकडून विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ९३ (१) नुसार या कंपन्यांनी व्यवसाय करण्याआधी परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांचे उपयोजन आणि संकेतस्थळे बंद करण्याबाबत सायबर सेलच्या विशेष महानिरीक्षकांना कळवावे, असेही पत्रात नमूद केले आहे.एमएमटी, गोआयबीबो, रेडबस, गोझो कॅब, सवारी, इन ड्राइव्ह, रॅपिडो, कार बझार, टॅक्सी बझार, ब्ला ब्ला कार, कॅब-ई, वन वे कॅब, क्वीक राइड, एस राइड, गड्डी बुकिंग बाय कुलदेव, टॅक्सी वॉर्स, रूट मॅटिक आणि ओनर टॅक्सी या १८ कंपन्यांकडून बेकायदारीत्या व्यवसाय सुरू आहे. ओला आणि उबरकडूनही विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याप्रकरणी परिवहन विभागाला आधी पत्र पाठविण्यात आले होते. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत त्यांच्याबाबत अंतिम निर्णय होणार आहे. त्यामुळे उपयोजन व संकेतस्थळे बंद करण्यासाठी पाठविलेल्या कंपन्यांच्या यादीत ओला, उबरचा समावेश नाही, असे प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी म्हटले आहे. वातानुकूलित टॅक्सीच्या दरात ओला आणि उबर कंपनीने भाडेवाढ केलेली नाही. यामुळे कॅबचालकांकडून बेमुदत बंद सुरू होता.



# पुणे-नाशिक महामार्गासाठी तोडलेली झाडे महागात!

## पुन्हा झाडे लावण्यासाठी २३ कोटी देण्याचा आदेश




**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रीय हरित लवादाच्या (एनजीटी) खंडपीठाने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) दणका दिला आहे. पुणे-नाशिक महामार्गासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यात झाडे तोडल्यानंतर पुन्हा झाडे लावण्यासाठी वन विभागाला २३ कोटी रुपये देण्याचा आदेश खंडपीठाने दिला आहे. वन खात्याला पैसे देण्यासाठी प्राधिकरणाला एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे.पुणे-नाशिक महामार्गाचे काम २०१७ मध्ये पूर्ण झाले. हे काम करताना प्राधिकरणाने मोठ्या प्रमाणात झाडे तोडली. महामार्गाच्या कामासाठी जेवढी झाडे तोडली तेवढीच प्राधिकरणाने पुन्हा लावणे नियमानुसार बंधनकारक होते. मात्र, प्राधिकरणाने केवळ कागदोपत्री झाडे लावल्याचे दाखविले. याबाबत माहिती अधिकारांतर्गत विचारणा केल्यानंतर झाडे लावण्यात आल्याची माहिती प्राधिकरणाने दिली होती. प्रत्यक्षात प्राधिकरणाने झाडे लावली नव्हती.याप्रकरणी अहमदनगरस्थित पर्यावरणवादी कार्यकर्ते गणेश बोऱ्हाडे यांनी २०२० मध्ये लवादाकडे याचिका दाखल केली होती. पुणे-नाशिक महामार्गाच्या कामासाठी तोडलेल्या एका झाडासाठी दहा झाडे लावण्याचे निर्देश प्राधिकरणाला द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली होती. यावर खंडपीठाने प्राधिकरणाला तोडलेल्या एका झाडासाठी प्रत्येकी १० झाडे लावण्याचे निर्देश आधी दिले होते. त्या वेळी सामाजिक वन विभागावर ही जबाबदारी सोपवून त्यांनी झाडे लावावीत आणि यासाठी प्राधिकरणाने पैसे द्यावेत, असेही निर्देशही देण्यात आले होते. प्रत्यक्षात प्राधिकरणाने वन विभागाला याचे पैसे दिले नाहीत. वन विभागाचा बँक खाते क्रमांक नसल्याचे कारण प्राधिकरणाकडून देण्यात आले होते. त्यामुळे झाडे लावण्याचे काम होऊ शकले नाही. आता लवादाने प्राधिकरणाला एक महिन्याच्या आत वन विभागाला पैसे देण्यास सांगितले आहे. हे पैसे वन विभागाच्या थेट बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. याप्रकरणी पुढील सुनावणी १० एप्रिलला होणार आहे.वन विभागाला झाडे लावण्यासाठी पुणे जिल्ह्यात १० कोटी ९० लाख रुपये, अहमदनगर जिल्ह्यात आठ कोटी ९६ लाख आणि नाशिक जिल्ह्यात तीन कोटी ५४ लाख रुपये असा एकूण २३ कोटी ४० लाख रुपयांचा खर्च होणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला थेट वन विभागाच्या खात्यात ते जमा करावे लागतील.राष्ट्रीय हरित लवादाच्या (एनजीटी) खंडपीठाने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) दणका दिला आहे. पुणे-नाशिक महामार्गासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यात झाडे तोडल्यानंतर पुन्हा झाडे लावण्यासाठी वन विभागाला २३ कोटी रुपये देण्याचा आदेश खंडपीठाने दिला आहे. वन खात्याला पैसे देण्यासाठी प्राधिकरणाला एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे.पुणे-नाशिक महामार्गाचे काम २०१७ मध्ये पूर्ण झाले. हे काम करताना प्राधिकरणाने मोठ्या प्रमाणात झाडे तोडली. महामार्गाच्या कामासाठी जेवढी झाडे तोडली तेवढीच प्राधिकरणाने पुन्हा लावणे नियमानुसार बंधनकारक होते. मात्र, प्राधिकरणाने केवळ कागदोपत्री झाडे लावल्याचे दाखविले. याबाबत माहिती अधिकारांतर्गत विचारणा केल्यानंतर झाडे लावण्यात आल्याची माहिती प्राधिकरणाने दिली होती. प्रत्यक्षात प्राधिकरणाने झाडे लावली नव्हती.याप्रकरणी अहमदनगरस्थित पर्यावरणवादी कार्यकर्ते गणेश बोऱ्हाडे यांनी २०२० मध्ये लवादाकडे याचिका दाखल केली होती.

> **वन विभागाच्या पुणे क्षेत्राच्या अंतर्गत पुणे – नाशिक महामार्गासाठी खेड ते सिन्नर या टप्प्यात झाडे तोडण्यात आली होती. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ही झाडे तोडली होती. झाडे लावण्याची जबाबदारी वन विभागाकडे देण्यात आली असून, त्याचे पैसे प्राधिकरणाने द्यावयाचे आहेत. प्राधिकरणाकडून पैसे मिळाल्यानंतर हे काम सुरू होईल.**
>
> **– विवेक खांडेकर,**
> **अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक**

# कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणातील दहशतवादी पुण्याच्या दिशेने?

## दहशतवादी बॉम्बस्फोटानंतर बंगळुरूहून बसने पुण्याच्या दिशेने आल्याचा संशय

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बंगळुरुतील रामेश्वरम कॅफेत एक मार्च रोजी झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील संशयित दहशतवादी बॉम्बस्फोटानंतर बंगळुरूहून बसने पुण्याच्या दिशेने आल्याचा संशय राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) व्यक्त केला आहे. त्यादृष्टीने तपास सुरू करण्यात आला आहे. बॉम्बस्फोट घडविल्यानंतर संशयित दहशतवादी बसने कर्नाटकातील बल्लारीपर्यंत गेला. बल्लारी स्थानकातून बस बदलून संबंधित दहशतवादी कर्नाटकातील होस्पेट, गोकर्णपर्यंत गेल्याचा संशय आहे. तेथून तो बसने पुण्याच्या दिशेने आल्याची माहिती 'एनआयए'ला मिळाली आहे. मात्र, संशयित दहशतवादी नक्की पुण्यात पोहोचला किंवा वाटेत त्याने बस बदलली, याबाबत




सांगता येत नाही, अशी माहिती 'एनआयए'च्या अधिकाऱ्यांनी दिली. कर्नाटकातील तपास यंत्रणांनी याबाबतची माहिती 'एनआयए'च्या पुणे-मुंबईतील पथकांना दिली आहे. मात्र, संशयित दहशतवाद्याचा वावर नेमका कोठे आहे, हे निश्चित सांगता येत नाही. संशयित दहशतवादी नेमका कसा पसार झाला. यादृष्टीने तपास सुरू आहे. बंगळुरुतील बल्लारी, होस्पेट, भटकल, गोकर्ण या बसस्थानकांतील सीसीटीव्ही चित्रीकरण मिळवण्यात येत आहे. भटकल, गोकर्ण, बेळगाव, कोल्हापूरमार्गे तो पुण्याच्या दिशेने आल्याचा संशय असल्याचे 'एनआयए'च्या अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले.दरम्यान, बंगळुरूतील रामेश्वरम कॅफेत १ मार्च रोजी बॉम्बस्फोट घडविण्यात आला. स्फोटकांनी भरलेली पिशवी ठेवून संशयित दहशतवादी तेथून पसार झाला. स्फोटानंतर तपास यंत्रणांनी रामेश्वरम कॅफेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले. चित्रीकरणात संशयित दहशतवादी आढळून आला. चित्रीकरणाद्वारे संशयिताची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.